INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# क्षितिज : आकलन, आस्वाद आणि चिकित्सा
## (Horizons: Perception, Taste and Therapy)

**डॉ. कोमल ठाकरे**
प्राध्यापक,
तायवाडे कॉलेज, महादूला- कोराडी

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2023-48488137/IRJHIS2307009

***गोषवारा :***

*डॉ. राजन जयस्वाल यांचा नुकताच **क्षितिज** हा अकरावा काव्यसंग्रह आकांक्षा प्रकाशन नागपूर यांनी प्रकाशित केला. ९७ कविता समाविष्ट असलेला १०८ पृष्ठसंखेचा हा कवितासंग्रह त्यांनी त्यांच्या जीवनाचे क्षितिज विस्तारण्यासाठी धडपडणाऱ्या सहधर्मचारिणीस अर्पण केलेला आहे. स्वतंत्र अर्थ घेऊन प्रकटणाऱ्या या ९७ कविता म्हणजे राजन जयस्वाल नावाच्या काव्यक्षितीजावर स्वयंतेजाने, स्वयंस्फूर्तीने झळकणाऱ्या ९७ चांदण्या आहेत. निसर्गप्रतिमांचे तेज लेऊन या कविता प्रकटलेल्या आहेत. मानवी जीवनातील भावसत्यांना, मानवी नातेबंधातील व्यामिश्र भावभावनांना, मूल्यगर्भ जाणिवांना, आयुष्यप्रवासातील हर्षामर्षाच्या उत्कट प्रसंगांना, अनुभवांना, सामाजिक व राजकीय जाणीवांना, प्रेमाला निसर्गप्रतिमांच्या सौंदर्याचं लेणं लेऊन, शब्दवैभवाचं कंकण बांधून अतिशय प्रभावीपणे या कविता रसिकांच्या स्वाधीन केलेल्या आहेत. वैदर्भीय मातीच्या रूपरसगंधस्पर्शात्मक जाणिवेच्या प्रतिमास्पर्शाने ही कविता बहरून आलेली आहे. त्या कवितेचे आकलन आस्वाद आणि चिकित्सा या लेखातून करण्यात आलेली आहे.*

***सूचक शब्द*** *: कवी, कविता, भावना, संवेदना प्रतिमा, जाणीवा, क्षितिज, निसर्ग*

**प्रस्तावना :**

सुप्रसिद्ध साहित्यिक, रसाळ वक्ते, कुशल अध्यापक, सामाजिक, सांस्कृतिक, वांग्मयीन चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते, संवेदनाशील कवी, नाट्यवेडा रसिक, नाट्य परीक्षक, मार्गदर्शक नेतृत्व अशा अनेक पैलूंचा प्रत्यय ज्यांच्या व्यक्तिमत्त्वातून येतो ते म्हणजे राजन जयस्वाल. वनवासी संस्कृतीने नटलेल्या भूप्रदेशात जिथे झाडीबोलीची स्वतंत्र परंपरा जपली जाते. अशा पृथगात्म सांस्कृतिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर ज्या समाजशील चळवळ्या संवेदनशील व्यक्तींचे व्यक्तिमत्व ठळकपणे उठून दिसतं. विद्यार्थी मनात नवजाणिवांचे बीजारोपण करणाऱ्या या प्रतिभेने शैक्षणिक

जीवनात आपल्या अमोघ वक्तृत्वशैलीने निराळाच प्रभाव निर्माण केला डॉ. राजन जयस्वाल यांच्या प्रसन्न, मिस्कील, खेळकर वक्तृत्वशैलीने रसिकमन जिंकले. सर सातत्याने कविता लेखन करीत आले. त्यांचे चौकार, चौफेर, चौसर, चउक, चौपाट, मिस्किली असे प्रासंगिक चारोळी कविता संग्रह प्रकाशित झालेत. या कवितांनी विदर्भातील पहिले चारोळीकर म्हणून त्यांना विशेष लौकिक प्राप्त झाला. चारोळी लेखनाचा प्रयत्न विदर्भात प्रथमतः त्यांनीच केल्याचे लक्षात येते. त्यानंतर त्यांचे आदवा, एका फुलाची बाग, तरंग-अंतरंग, माजी तुतारी व क्षितिज असे कवितासंग्रह प्रकाशित झालेत. कानेटकरांची नाट्यसृष्टी व वाङ्मयातील वैचारिकता हे दोन संशोधनात्मक ग्रंथ अभ्यासकांसाठी महत्त्वाचे ठरलेत एकूणच झाडीबोली संस्कृतीची ओळख निर्माण करणाऱ्या व ती मराठी मनात रुजविणाऱ्या राजन जयस्वाल सरांच्या वांग्मयीन व सामाजिक कार्यकर्तृत्वाला मुजरा करणारे अनेक मानसन्मान त्यांच्या वाट्याला आलेत. त्यांच्या क्षितिज या काव्यसंग्रहातिल आशयाभिव्यक्तीचा खालीलप्रमाणे शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**कौटुंबिक नात्यातील भावस्पंदने** –

उपजतच लाभलेल्या सर्जनशील जाणिवेतून कवीने आपली रसिकता प्रामाणिकपणे जपलेली आहे. अतिशय संस्कारक्षम अशा काव्यप्रतिभेने कौटुंबिक नात्यातील भावसंवेदना त्यांनी प्रकट केलेल्या आहेत. जे परवडणारे नाही ते करणारी आजी कवीने शब्दांकित केलेली आहे. आजीने सांगितलेल्या कथेवर ज्या कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा पिंड पोसल्या गेला त्या कवीला आजच्या कथेत राक्षसच राजकुमार बनून येत असल्याचे दिसते. एकूणच कालानुरूप बदलत्या परिस्थितीचे विदारक चित्रण निमित्ताने कवी करतो. आईच्या नसण्याने हरविलेल्या सुख, समाधानाचे वेदनादायी दुःख कवी 'आई' या कवितेतून उत्कटपणे व्यक्त करतो. डोळ्यात पाणी गोठून दिशाहीन वावरत असल्याची जाणीवही त्याला होते. स्वतःच्या कष्टाने उभारलेल्या इमारतीतला घरपणा हाच कवीला जग पेलण्यासाठी बळ देणारा वाटत असल्याची जाणीव 'उबदार घरटे' या कवितेतून ते प्रकट करतात. जुन्या पारंपारिक कथेला नवरूप देणार काव्य या कवीने लिहिलेले आहे. मानवी नात्यांचे डोंगर दुरूनच बघण्याचा सल्ला कवी 'नाते' या कवितेतून देतो. जे लोक कर्तव्याचे स्मरण करतात ते दुःखी होतात त्यामुळे कर्तव्य करून विसरून जाणे जास्त लाभदायी ठरते. नात्याचे डोंगर दुरून छान दिसते असा विचार त्यांनी व्यक्त केलेला आहे. स्त्री-पुरुषाच्या अतूट नातेबंधाला ते 'सुई मागे यावे दोऱ्याने' या कवितेतून उत्तमरीत्या रेखाटतात. सुई स्त्री तर दोरा पुरुष अशी रूपकात्मक रचना ते करतात स्त्रीमागे पुरुषाने यावे तसा तू माझ्यामागे आलास 'मी तर जखमा करीत, निघून गेले, तू मात्र उसवलेले शिवत तिथेच थांबलास, आजन्म' अशी पुरुषाच्या सहकार्य भावनेची व त्यागाची जाणीव व्यक्त करणारी स्त्री कवीने रेखांकित केलेली आहे. ''मी कधी बोचत, कधी शिवत जाते, तू मात्र सदैव फाटलेले जोडत राहतोस'' असा पुरुषाबद्दलचा स्त्री मनातील अत्यंत प्रेमळ व व्यापक दृष्टिकोन कवी प्रकट करतो. घरादाराची वाटणी झाल्यानंतर वाट्याला येणाऱ्या वेदनेचा अर्थ कवीने 'आभाळ' या कवितेतून प्रकट केलेला आहे.

आभाळाची वाटणी झाल्यावर इंद्रधनुष्यानं कुठे उगवावं ! तसं घरदार वाटून झाल्यावर ज्या सप्तपदीच्या वचनाचं पालन करायचं तू ठरवलं त्याचं काय करायचं ही कवीमनातील सल यातून प्रकट झालेली आहे. एकदा घराच्या भिंती तडकल्या की, दारातून दैन्य येते आणि चैतन्य निघून जाते. घराला घरघर लागते. जीवनचक्राला तडा गेला की, घराशी असणारे घरपणाचे नाते कसे तुटून जाते. ही जाणीव कवीने 'घराला लागते घरपण' या कवितेतून रेखाटलेली आहे. एकूणच संयुक्त कुटुंब पद्धती, त्या कुटुंबातील एकमेकांवर निश्चित प्रेम करणारे घटक, त्यांचे आंतरिक अतूट नातेबंध, स्त्री-पुरुषांमधील प्रेमबंध, सदैव प्राजक्तांसारखी सुगंध देणारी समर्पित जीवन जगणारी स्त्री, तिचा त्याग, जखमा उरात घेऊन भडभड बोलणाऱ्या भाबड्या स्त्रीला दिलेला सल्ला, दुर्गुणासह तिला स्वीकारताना होणाऱ्या आनंदातून निर्माण झालेले कवी मनातील पत्नी प्रेम या कवितांतून अत्यंत प्रभावीपणे प्रकट झाले आहे .

**मूल्यजाणिवा** –

मानवी जीवनमूल्यांवर कवीचे प्रेम आहे. स्वतःच्या कष्टावर, श्रमशक्तीवर त्यांचा प्रचंड विश्वास आहे. स्वसामर्थ्याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच ते तळहातावरील असणाऱ्या रेषांप्रमाणे आयुष्यातील यशापयशाला, सुखदुःखांना न जुमानता 'मनगटांना लाभू दे, सामर्थ्याचे कंकण, मग हस्तरेषा, आपोआप सरळ होतात' (गार पृ.1) असा आत्मविश्वास प्रकट करतात. आसक्तीच्या आत्महत्येमुळे अप्रत्यक्षपणे नीतिमत्तेचा प्रभाव निर्माण झाल्याचे त्यांनी 'मालमत्ता हीच नीतिमत्ता' या कवितेतून प्रकट केले. आजच्या काळात बदललेल्या नीतिमत्तेचे स्वरूप सूचकपणे यातून उलगडलेले आहे. अर्धमेली झालेली माणुसकी व पोरकी झालेली बिचारी मानवता यातून मानवी मूल्याच्या ऱ्हासाची जाणीव कवी अत्यंत हळवेपणाने करून देतो. कुत्सिपणे वागणाऱ्या लोकांची कवी उपहासात्मकरीत्या 'तिसरा हात' मागून टर उडवितात. 'देवा त्यांना तिसरा हात दे, आल्यागेल्याला सलाम करण्यासाठी, दोन हात आधीच गुंतले आहेत, पुढे जाणाऱ्यांचे पाय ओढण्यात' (तिसरा हात, पृ. १७) अशाप्रकारे कवी देवाला तिसरा हात, पाय, कान आणि डोळा मागतात. ज्या अवयवांचा लोक सत्कार्यासाठी उपयोग न करता पुढे जाणाऱ्यांचे पाय ओढणे, आल्यागेल्याला लाथा हाणणे, कर्णकर्कश चुगल्या करणे, बघू नये ते सारे बघणे हे करण्यात दोन हात, दोन पाय, दोन कान, दोन डोळे गुंतले आहेत. तेव्हा तिसरा हात, पाय, कान, डोळा ते या दुष्कृत्यावर मात करण्यासाठी मागत आहेत. इतरांच्या आयुष्यावर चिखल उडविणारे, त्यांना चिखलात लोटणाऱ्या लोकांचे कवीने आभार मानले. कारण ते त्या कृत्यामुळेच कमळासारखे बहरून आल्याचे ते व्यक्त करतात. एका विशिष्ट ध्येयाने मातीतून मूर्ती घडवू पाहणाऱ्या व्यक्तीचे स्वप्नभंग झाले तरी चित्त विचलित होऊ न देता चित्ताची मातीबद्ध अथांगता अनुभवून मातीमोल जीवनाला समजून घ्यावे लागते. असे ते 'अवकाश मातीत मावते' या कवितेतून प्रकट करतात. तर जळून जळून फुकट मरण्यापेक्षा जरा फुलायला शिकलं पाहिजे. हा संदेश कवी 'समई आणि मोक्ष' या कवितेतून देतात. देवघरातली फुलं आणि समईच्या संवादातून कवीने एक निराळाच अर्थ प्रकट केला आहे॰ ही सुंदर

कविता आहे. ''देवघरातली फुलं, समईला म्हणाली, जळून जळून फुकट मरशील, जरा फुलायला शिक, समई तेज उधळत होती, खट्याळपणे फुल हसली, वाजतगाजत फुल चढली, सुकत जाऊन फुल घडली, निर्माल्य होऊन फुल उतरली. -समई मंद जळतच होती, कोपऱ्यातल्या निर्माल्याला, चढवायच्या नव्या फुलाला, प्रकाश अवघा वाटत होती, समई विचार करू लागली, कालची फुलं, आजचं निर्माल्य, आजची फुलं उद्याचं निर्माल्य, एक दिवस देशसेवा अन त्यांना पटकन मोक्ष, मी किती जळायचं, तेल वाढवायचं, वाती बदलायच्या, मी मात्र जळतच राहायचं, देवा ! मला मोक्ष केव्हा !'' जळणाऱ्या समईचा हा प्रश्न अंतर्मुख करणारा वाटतो। कवीची प्रकाशावर श्रद्धा आहे. तम सो मा ज्योतिर्गमयाची जाणीव त्यांना आहे. म्हणून 'दिवा' या कवितेत ते स्पष्ट करतात की अंधारासाठी वाऱ्याने कितीही घाव घातले तरी आपण इथे दिवा लावू. कारण इथे प्रकाश यायला आतुर झालाय. परिस्थितीवर मात करून उजेड्याचं साम्राज्य निर्माण करणाऱ्या कवीची प्रचंड महत्वकांक्षा यातून दिसून येते संकटावर मात करण्याचे सामर्थ्य कवीत आहे. त्यामुळे त्यांनी संकटांना संधी मांडण्याची मला सवयच जडल्याने आताशा संकटच माझ्याकडे येताना डगमगतात. असा दृढ विश्वास प्रकट केला. तसेच विश्वासाच्या हत्याराने लचके तोडणारे सराईत मारेकरी मित्र म्हणून सोबत असताना जीव मुठीत घेऊन जगणे आता सवयीचे झाल्याचे प्रकट करून आपलेच मित्र आपले वैरी कसे होतात॰ या अनुभवाला ते शब्दबद्ध करतात. 'कावळेबाज शाप' सारख्या कवितेतून मानवी वृत्ती प्रवृत्तीचं दर्शन ते घडवितात आपल्या कवितेतून सुंदर संदेशही ते देतात. कार्यक्रमात आभार व्यक्त करण्यासाठी अशा कवितेचा छान वापर करता येतो. प्रेमाचा महिमा व्यक्त करताना त्यांनी 'देऊळ' या कवितेतून ऋणमुक्त न होता आभाराच्या भाराखाली भारावलेले असू द्यावे. अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

वृक्षाप्रमाणे जीवन जगा रुक्ष जीवन जगू नका. ठेरेदार झाड व्हा. असा संदेश त्यांनी दिलेला आहे. सुखाच्या संसर्गाची सुखालाच दृष्ट लागते त्यामुळे सुखाची दृष्टी हरवते आणि दृष्टीचे सुख शिल्लक राहते हा विचार सुंदररित्या ते अभिव्यक्त करतात. सर्व संकटावर मात करून पुन्हा नवं स्वप्न साकारण्याचा शोक असणाऱ्या मनाचं सुंदर चित्रण ते करतात. मनाच्या सुपात चांदण्याचे दाणे आले की, आयुष्याच्या जात्यातून आनंदाचे पीठ येते ही भावना ते अतिशय सुंदररित्या प्रकट करतात. दुःखाचे खडे टाकून सुखाचे पाणी वर आणण्यासाठी धडपडणाऱ्या जीवासाठी कावळ्याच्या प्रतिमेतून व्यक्त केलेली 'जीवन म्हणजे बाराखडी' ही काव्यमय भावना विलोभनीय वाटते . त्याबरोबरच पारंपारिक कथेला नवकाव्यरूप देण्याची त्यांची पद्धती सर्जनशील वाटते. अंधारातून प्रकाशाकडचा प्रवास प्रकट करताना 'अघोर रात्री' या कवितेतील प्रतिमा फार आशयगर्भ आणि अर्थपूर्ण वाटतात जखमी काळोखाचे प्रकाशबंबाळ होणे किंवा अंधारात खूपसनारी प्रकाशाची वाघनखं या प्रतिमातून कवी अघोर रात्रीचा भयंकरपणा प्रकट करून त्यावर मात करणाऱ्या प्रकाशाचे प्रखर असणे अभिव्यक्त करतो. 'त्या तळपत्या सूर्याला सांगा' या कवितेतून त्यांनी सूर्याच्या तेजस्वी उजेडाने डोळे दिपले पण वाट गवसली नाही. ही भावना व्यक्त केली. तसेच 'गर्भार ढग' या कवितेतून निर्भर पंखाने गरुडभरारी

घेताना गर्भार ढगांनी त्याला थोपवू नये. ओल्या श्रावण किरणांना वादळ सरींनी थांबवू नये. अर्थातच कुणाच्या प्रगतीच्या आड येणारी लक्ष्मणरेषा कोणी आखू नये. असा सूचक संदेश कवी निसर्ग प्रतिमांच्या सुंदर वापरातून देतात संकटाचे पर्वत चढून जाणारे बहाद्दर भेटल्यापासून कवीला पराक्रम वंदनीय वाटायला लागल्याचे 'दु:खाचे पर्वत' या कवितेतून त्यांनी स्पष्ट केले. कष्ट करूनही 'हु लकावणी देणारं नशीब वाट्याला आले तरी कुणाच्या तरी परिस्पर्शाने यश वाट्याला येत असल्याची सकारात्मक भावसंवेदना त्यांनी प्रकट केलेली आहे. जगण्यापेक्षा झिजणे स्वीकारणे याचे कवीला भूषण वाटते. 'श्रीफळ' या कवितेतूनही सत्कार मूर्तीवर त्यांनी केलेलं रूपक हे अत्यंत सूचक असे आहे

**निसर्गप्रतिमातून प्रकटलेल्या मूल्यजाणीवा** –

कवीला मूलतः निसर्गाचे वेड आहे. निसर्ग आणि मानवातल्या अतूट नात्याची तीव्र जाणीव त्यांना आहे. त्यामुळे निसर्ग प्रतिमातून ते मानवी जीवनजाणिवा प्रकट करतात निसर्गाच्या प्रेमापोटी ते 'फुलांची बाग' प्राणपणाने जपतात. सुकलेली जीर्ण पिंपळयाची पानं जुन्या रूढी परंपरेप्रमाणे गळतात त्या गळणाऱ्या पिंपळपानांच्या परंपरेत कवी नवतेची बीजं शोधतो. ज्या झाडाच्या फांदीवरून 'पाखरू' आकाशात उडाले आणि पाने जमिनीवर पडलीत, त्या फांदीची वेदना कवीने शब्दबद्ध केलेली आहे. अनेकार्थक्षमता हे जयस्वाल सरांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. निसर्गप्रतिमातून मानवी भावभावना, जीवनजाणिवा प्रकट करणे हे त्यांना सहज गवसते. ''पृथ्वीच्या जन्माला आले की, अबला म्हणून जगावेच लागते, हे बिचाऱ्या आकाशाला, कुणी सांगाल का?'' या प्रश्नातून मला आकाश होता येत नाही ही विनम्र भावना प्रकट करणारा कवी किती नम्र आहे याची जाणीवही आपल्याला होते. शिवाय त्याचे पाय हे मातीवर कसे आहे याचीही कल्पना येते. 'सूर्य सावली देतो' या कवितेतून वृक्षाचे आभार मानताना वृक्षाच्या त्या सावलीला सरकावणाऱ्या ऊन सावली देणाऱ्या सूर्याबद्दलची कृतज्ञता कवी व्यक्त करतो. ही सूचक कविता आहे. आपण वरवरच्या गोष्टींना महत्त्व देतो पण त्या घटनांच्या मागे असणाऱ्या शक्तींना जाणत नाही. त्या झाडाकडे बघताना त्या झाडाला वाढविणाऱ्या सूर्याकडे बघण्याची व्यापक दृष्टी मात्र कवीला आहे. पंखात बळ येताच झेप घे म्हणणारं, अवघडलेली माणुसकी निजवायला घरटं हवं असतं आणि असे घरटे बाळगणारे ममतेचे झाड हवे असते अशी 'पाखरू - घर - झाड यांचा अन्योन्न संबंध सांगणारी कविता कवीच्या चमत्कारिक प्रतिभेचा आणि प्रतिमेचं अनोखं वैशिष्ट्य आहे. 'ज्या झाडावर घरटं असतं, ते झाड वांझ नसतं' असं सूचकपणे कवी व्यक्त करतो. 'छाटलेले पंख' या कवितेतून कवीने घायाळ मनाचे संगोपन करणारे छाटलेल्या पंखाचे पक्षी व त्यांची व्यथा, वेदना आशा-आकांक्षा अत्यंत मार्मिक शब्दात प्रकट केली आहे. तसेच 'उन्हातल्या वेली' यातूनही बोन्साय जगण्यात आनंद मानणाऱ्याला दिलेला सल्ला महत्त्वाचा वाटतो. सावलीची सवय वाढ खुंटविणारी कशी आहे? याचे मार्मिक वर्णन कवी करतात. 'वृक्ष' किंवा 'लता वेली राहू नका' अशा कवितातून कवी मानवी अस्तित्वाला अस्तित्व बहाल करून स्वावलंबी होण्याचा, स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा सूचक संदेश देतात. 'नवे प्रलय मांडू नकोस' असा विचार प्रकट करतात.

आठवणीचे श्वास गोंजारल्यानंतर तुझ्या संवेदना जाग्या झाल्या तर तू रुसू नकोस, नवे प्रलय मांडू नकोस. अशी याचना कवी करतो. यातील 'गहाण आठवण' किंवा 'रेशीम संवेदना' या प्रतिमा अतिशय बोलक्या वाटतात. 'गोंदलेली संध्याकाळ' या कवितेतील निसर्गप्रतिमा मानवी जीवन जाणिवांची सूक्ष्म भावस्पंदन टिपत असतात. जसे आभाग्याच्या हस्तरेषाप्रमाणे अस्ताव्यस्त आभाळावर गोंदलेली संध्याकाळ, आर्त फाटलेल्या उन्हाप्रमाणे पापण्यांच्या पलीकडे पसरलेला अंधार, मातीत हरवलेल्या आभाळाप्रमाणे पिसाळलेल्या नदीतील दिशाहीन आवर्त इ. निसर्ग आणि मानवात निर्माण झालेला परात्मभाव कवी 'निसर्ग नियम' या कवितेतून प्रकट करतात. व्यवहारालाच जीवन म्हटल्या जाऊ लागल्याने, व्यवहाराचेच नियम झाले आणि नियमांच्या वरवंट्यात निसर्ग भरडल्या गेला, तर जीवन भेदरल्याशिवाय राहणार नाही. असा विचार कवीने प्रकट केला आहे. या कवितासंग्रहातील 'स्वप्न', 'अभिलाषा', 'स्वप्न दे मला', 'माझ्या कवितेचे वय किती', 'मौनाचे संदर्भ निश्चल होतात', 'बिनकाट्याची घडाळे', 'देवा तुम्ही मला काय म्हणाल', 'सांजवात', 'अपार्थीव चांदणे' आणि 'क्षितिज' या कविता कवीच्या व्यक्तिगत भावभावनांची मानसिक आंदोलने प्रकट करणाऱ्या आहेत. प्रत्येक हवेहवेसे वाटणारे स्वप्न मिळविले असले तरी हरवले ते विसरण्यात जन्म घालवण्याला सुख, समाधान म्हणायचे का? या प्रश्नातच कवीमन सुखाची परिभाषा शोधते. तर 'अभिलाषा' कवितेतून कवी हा श्रीमंत, समृद्ध, रसिक, आस्वादक आहे असे असणे हे पापाचे लक्षण नाही अथवा गुन्हा नाही. असे असले तरी लुटारूंचा हव्यास अन आस्वादकाची अभिलाषा यातला भेद कळावा अशी अपेक्षा कवीने केलेली आहे.

मांगल्याच्या पायघड्यावरून सौंदर्याकडे जात जीवा-शिवाची चैतन्यदायी भेट घडून केवलानंद लाभू दे. अशी अभिलाषा बाळगतो. आपल्या आवाक्यात असेल तितके आपल्या क्षमतेप्रमाणे 'स्वप्न दे मला' असे कवी म्हणतो. त्यांच्या स्वप्नात क्षितिजाच्या वेना, समुद्राचे गर्भारपण, ज्वालामुखीचे उद्रेक नसतात। इथे त्यांनी झोपेला प्रार्थना करून डोळ्यात मावतील अशीच स्वप्न मागितली आहेत. त्यांनी वामन आणि बळीराजा ही पारंपारिक मिथके वापरून कवितेला नवा अर्थ प्राप्त करून दिलेला आहे. कालानुरूप परंपरेतील घटना आता उलट्या झाल्यात असे यातून दिसून येते मुळातच वामनाने तीन पावले उचलून एका पावलानं जमीन झाकली. दुसरे पाऊल आकाशावर ठेवले आणि तिसरे पाऊल बळीराजाच्या डोक्यावर अशी पारंपरिक समज आहे. पण इथे बळीराजांनी अधांतरी पाय उचलला आणि कवीची वामन होण्याची धडपड स्वप्नात बघताच डोळे डबडबले म्हणून अशक्यप्राय स्वप्न बघण्यापेक्षा अर्थात वामन होण्यापेक्षा आवाक्यातील स्वप्न देण्यासाठीच कवी झोपला झोपेला प्रार्थना करतो. 'माझ्या कवितेचे वय किती' यातून कवीने आपल्या आयुष्यातील वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावरील भावसंवेदना टिपलेल्या आहेत. त्यांचे बालपणात रमणे, तरुणपणात कॉलेजमधील जीवन व्यक्त करणे, त्यांचे मोर्चात भटकणे, अन्यायग्रस्तांना खाली खुशाली विचारणे, डिस्कोच्या तालावर नाचणे, अभंगाच्या तालावर डोलणे, वर्तमानात परिस्थितीने अस्वस्थ होणे, मानवतेची होरपळ बघून बेचैन

होणे, एकूणच जगाची विसंगत चलाखी हा कवी शब्दांकित करतांना स्वत:च्या मनातील भावभावनांची मानसिक आंदोलने शब्दांच्या चिमटीत पकडतो. यातून संवेदनशील कवीच्या व्यक्तित्व विकसनाचा प्रवास आपल्या लक्षात येतो. कवीची प्रतिभा जीवनप्रवासाच्या सर्व वळणावरची भावस्पंदने टिपते. शेवटी कवितेला कुठे का वय असते? असा प्रश्न करून कवीच्या वयाप्रमाणेच तिची आवर्तने ते मांडतात. तसेच मौनात दडलेले वास्तवाचे संदर्भ मांडून 'मौनाचे संदर्भ निश्चल होतात' या कवितेला शब्दांकित करतात . या जन्मातच भेट घेऊन सुख भोगणे आवश्यक असल्याचे कवी 'बिनकाट्याची घड्याळे' यातून स्पष्ट करतात. घड्याळाचे काटे एकमेकांना भेटतात पण आपल्याला भेटायला वेळ नाही म्हणून पुढच्या जन्मात घड्यायचे काटे होण्याचा विचार असला तरी तोपर्यंत बिनकाटाची घड्याळे प्रचलित झाली तर! म्हणून गतिशील जगात भेटीचा आनंद लुटण्याचे समाधान घ्यायचे कवींनी सूचित केले आहे. 'तुम्ही मला काय म्हणाल' या कवितेतही कवीने पारंपरिक संकेताला बगल देऊन नवा अर्थ प्रतीत केला आहे. आज जर गुरु द्रोणाचार्याने अंगठा मागितला तर कवी म्हणतात, 'मी मात्र त्यांना हा अंगठा, थम्सअप सारखा दाखवून, सॉरी म्हटले''

कवीने आयुष्याच्या सायंकाळचे वर्णन सांजवात या कवितेतून केले आहे आयुष्याच्या शेवटी अखेरचा श्वास घेण्याचे क्षण कवीने शब्दबद्ध केले आहे. 'दिवा विझला की निरांजन पालथे कर' यातून समारोपीय हृद्य भावना त्यांनी प्रकट केलेल्या आहेत कवीने आपल्या आयुष्य गाण्याला 'अपार्थिवाचे चांदणे' या कवितेतून फारच सुंदररित्या रेखाटले आहे निसर्गप्रतिमांनी त्या जीवन गाण्याला अधिक गहिरा अर्थ दिलेला आहे. या जीवनात त्यांना आप्त वाटणारी इमानदार झाडं, निर्मितीप्रवृत्त भूमी, अंकुरणारी श्रावण समाधी, क्षितिज दर्शनाने अपार्थिव चांदण्यात शालीन झालेले कवीचे जीवनगाणे. जे कवीने मनःपूर्वक गायले आहे. जीवनमूल्यांचे आधार हरविले तरी काही व्यापक, विशाल जिवनसत्वांच्या क्षितिज दर्शनाने अलौकिक चांदण्यात कवीचे जीवन अधिक सार्थक शालीन झाल्याचे यातून प्रकटले आहे. हा कवी क्षितिजाजवळ थांबला आहे. आपली कविता कुठे थांबवावी याचे त्यांना चांगले भान आहे. त्यांची क्षितिज ही कविता त्यांच्या व्यापक, विशाल आणि विनम्र जीवनदृष्टीचे द्योतक आहे. क्षितिज ही अतिशय विशाल ब्रम्हांड्व्यापक अशी गोष्ट आहे. आपली दृष्टी जिथपर्यंत जाते त्याला आपण क्षितिज मानतो. पण ते क्षितिज नसतेच. कधी ते आकाश, पृथ्वी, अवकाश असते पण क्षितिज मात्र कुणीच नसते. या कवितासंग्रहाचे शीर्षकही सूचक आहे. आम्ही बघितलेल्या, अनुभवलेल्या सर्व जीवनजाणिवा कवीच्या दृष्टीने जशा वाटल्या तशा व्यक्त केल्या पण त्या क्षितिजासारख्या असतीलच असे नाही. त्याहीपेक्षा आणखी काही वेगळी अनुभवसत्ये असू शकतील असा सूचक संदेश कवीने स्वतःकडे विनम्रपणा घेत प्रकट केलेला आहे.

**सामाजिक व राजकीय जाणिवा** –

बदलत्या वास्तवाचे सामाजिक भान कवीला आहे. समाजातील विषमतेबद्दलची, विसंवादाबद्दलची चिडही त्यांच्या मनात आहे. अस्वस्थ मनातील नकळत प्रकटलेला उद्रेक त्यांच्या

कवितेतून प्रकटतो. ‘कलेवर’ या कवितेत ते म्हणतात, ‘माझ्या कलेवराला, तुडवून पळताना, भ्याडानो, कसं विसरलात, मी शहीद झालो, तुमच्यासाठी’’ (पृ. 76) जो तुमच्यासाठी प्राणाची आहुती देतो त्याच्याच प्रेताला तुडवून जाणाऱ्या भ्याडांवर कवी चिडले आहेत. तसेच ‘मनस्वी संताप’ या कवितेतूनही कवी तुच्छ जीवन जगणाऱ्याविषयीचा संताप व्यक्त करतात ‘आता मात्र, तुमच्या सिंथेटिक संतापाने, मरतूकडे कुत्रेही, जागचे हालत नाही, थू तुमच्या जिनगाणीवर’ (पृ.52) अशी चीड कवीने प्रकट केलेली आहे. याबरोबरच आज ‘मालमत्ता हीच नीतिमत्ता’ झाल्याची सार्वत्रिक जाणीव त्यांच्या कवितेतून प्रकटली. आसक्तीच्या आत्महत्येमुळे नीतिमत्तेचा अप्रत्यक्ष प्रभाव कवीला जाणवतो. संवेदनशील कवी मनाला मुलांना अनाथ करणाऱ्या नरमाधीची किळस येते. ही केळस त्यांनी ‘खुर्ट पीक’ या कवितेतून अतिशय उत्कटपणे रेखाटली आहे. खांद्याला खांदे देणारे लोक विश्वासू लोक आज दुर्मिळ होत असल्याचे चित्र त्यांनी ‘खांदे’ मधून रेखाटले आहेत, ते म्हणतात ‘सलामत बंदूक अन सलामत खांदे, अन्यथा खांदे बदलले, तर बंदूकही बदलते रोख, आणि सर्वस्व राख झाले तरी, चार खांदे होतात दुर्मिळ (पृ.6) समाजातील दारिद्र्यात जीवनाचा आनंद घेणाऱ्या समाधानी मुलांचे जगणे कसे कमालीचे आहे हे कवीने ‘कमाल आहे’ या कवितेतून सांगितले. तर विधवेच्या वाट्याला येणाऱ्या वैधव्यरेषा तिने प्रारब्ध म्हणून पुन्हा अंकुरण्याचे नाकारायचे का? असा प्रश्न करून समाजातील विधवेची वेदना कवीने मुकर केलेली आहे. ही कविता प्रारब्ध या शीर्षकाखाली आलेली आहे.

‘असा गरिबीचा गुन्हा’ ही सामाजिक आशयाची कविता एखादं चित्र काढावं अशी चित्रसदृश काव्यरचना आहे. कष्टकऱ्या माऊलीला आपल्या मुलाला दूध पाजता येत नाही हा गरीब असण्याचा गुन्हा असल्याचे कवी प्रकट करतो. तसेच ‘जखम’ या कवितेतून सातत्याने जखमा भोगणाऱ्या मनांच्या वेदनांचा जल्लोष धुंदपणे कवी प्रकट करतात. ‘एक जखम झेलू बाई, दोन जखमा झेलू’’ जखमा भोगण्याची, जगण्याची सवय लागलेल्यांना त्यावरचा उपायसुद्धा कवी सुचवितात ‘‘जखमावरचे लोकशाही मलम, स्वातंत्र्य! समता!! बंधुता!!! जयहिंद’’ समाजातील प्रामाणिक, नीतिवान, कर्तव्यबुद्धीच्या, सत्य वर्तनाच्या, आचरणशील व्यक्तीचा या शतकात होणारा अंत अनिवार्य ठरणे ही ‘काळाची गरज’ असल्याचे सुचवून कवीने आजच्या बदलत्या भीषण काळावर केलेले हे विदारक भाष्य आहे. ‘एक निंबू झेलू गड़े दोन निंब झेलू’ या पारंपरिक लोकगीताच्या रचनाबंधावर नव्या आशयाची कलम चढवून कवीने केलेली अंतर्विरोधात्मक रचना फारच मार्मिक वाटते मधुकर केचे ह्यांनी याच रचनेवर आधारित ‘एक रंग झेलू गडे, दोन रंग झेलू, श्रीरंग झेलू जाता, देह कशी तोलू’ ही कविता लिहिली. मधुकर केचे यांनी या कवितेत आध्यात्मिक रंग भरले. तर त्यांच्याही पुढे जाऊन राजन सरांनी त्यात सामाजिक आशय भरला. यावरून केचे ह्यांच्या पुढची कविता जयस्वाल सरांनी लिहिली. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. याबरोबरच राजकीय सत्तेच्या दिव्याने त्याच्या तेजाने आंधळे लंगडे होणाऱ्या मनाचं प्रकटीकरण कवी ‘सत्तेचा दिवा’ यातून करतात. तर ज्या लोकांच्या डोक्यात खुर्ची बसते त्यांना सत्तेची नशा कशी चढते याचे मार्मिक विश्लेषण कवी ‘खुर्ची आणि डोके’ यातून करतात

आणि शेवटी डोकेबाज होण्यापेक्षा खुर्चीबाज व्हा. असा उपहासात्मक संदेश देतात. या कवीवर पूर्वसूरींच्या कवितेचा प्रभाव जाणवतो. मर्ढेकरांनी 'तू एक मुंगी, मी एक मुंगी' या कवितेतून जो वास्तववादी विचार प्रकट केला. त्या विचाराच्या जवळ जाणारा, जीवन म्हणजे केवळ वळवळ नाही तर ती चळवळ व्हावी असा विचार कवी 'मुंगी' या कवितेतून प्रकट करतात. निर्भर पंखाने गरुडभरारी घेतांना गर्भार ढगांनी थोपवू नये . असा आशय असणारी 'गर्भार ढग' ही प्रतिमा किंवा 'आतड्याचे गिटार' या कवितेतील नपुंसक आशय, शरमेचे शेवाळ, सूर्य गिळून दिलेली पश्चिमेची ढेकर या प्रतिमा मर्ढेकरांच्या कवितेची आठवण करून देतात.

**प्रेम कविता** –

कवीने काही प्रेम कविताही लिहिल्या आहेत. फुलाप्रमाणे बहरलेल्या सखीचे चित्रण त्यांनी रेखाटले. राधाचं हरिचिंतन हा प्रेमप्रत्यय त्यांनी अनोख्या शैलीत प्रकट केलेला आहे. दुर्गुणासह तुला स्वीकारताना मी आनंदी असतो अशी 'प्रेम' कविता त्यांनी लिहिली. ही कविता 'प्रेम कुणावर करावं' या कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेची आठवण करून देते. तर तथागत गौतम बुद्धाच्या आयुष्यप्रवासाला अधोरेखित करणारी 'अनवानी अध्यात्म' ही कविता उ. रा. गिरी ह्यांच्या 'यशोधरा' या कवितेशी साधर्म्य साधतांना दिसते. राधाकृष्णाच्या मधुर मीलनाचा सौंदर्यदायी सोहळा 'सांजसावळी' या निसर्गप्रतिमातून कवीने अतिशय सुंदररित्या रेखाटलेला आहे माझ्या काजळलेल्या जखमांना 'तू आरसा दाखवू नकोस' असा लोकविलक्षण प्रेमप्रत्यय कवी आपल्या कवितेतून व्यक्त करतो. कालपर्यंतची नि:शब्द आज तू का आव्हानखोर ईमारत झालीस. असा प्रश्न ते 'गुलाबक्षी' मधून विचारतात. तर 'गुणगुणने थबकले' या कवितेतून कवी आणि ती यांच्यातील आत्मसंवादातून फुललेल्या उत्कट प्रेमाचा सुगंध येतो. जिच्या गुणगुण्यामुळे कवीचे गीत उमलायचे तिचे गुणगुणने थांबल्यामुळे कवीचे गीत रुसले असल्याची उत्कट जाणीव त्यांनी प्रकट केली आहे.

एकूणच अल्पाक्षररमणीयत्व हे कवीच्या काव्याचं विशेष वैशिष्ट्य आहे. अतिशय सहज सुबोध पण आशयाने समृद्ध आणि प्रगल्भ अशी ही कविता आहे. विषयाची विविधता या कवितेत आहे. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, प्रेम व मूल्य या सर्व पातळीवरील जाणीवा यातून प्रकटल्या आहेत त्यांच्या काव्यवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारा हा काव्यसंग्रह आहे. कुठे थांबावं हे कवीला बरोबर कळलेले आहे. ओढूनताणून ते आपल्या कवितेत प्रतिमा आणत नाही. आशयाला परिपूर्णता देणारी, अंतर्मुख करणारी सहजस्फूर्त रचना ते करतात. त्यामुळे ही कविता मनाला भावते. या कवीवर पूर्वसुरींच्या कवितेचा प्रभाव नक्की आहे. कुसुमाग्रज, मर्ढेकर, केचे याबरोबरच त्यांच्या 'गंधवेडी पहाट' या कवितेवरून सुरेश भटाचा सूर आवळल्याचा भास होतो तर निवडुंग, एकांत, देऊळ, आई, क्षितिज यातून ग्रेसांच्या प्रतिमांची अतिशय मनःपूर्वक आठवण होते. याबरोबरच अपार्थिवाचे चांदणे ही संत ज्ञानेश्वरापासून द.भी. कुळकर्णीपर्यंत आणि पुढे जयस्वाल सरांनी ओढलेली प्रतिमांची री आपल्याला जाणवते. ज्या कविता चारोळीत सामावल्या नाही त्या कवितांनी आपलं स्वतंत्र क्षितिज विस्तारलं.

नवीन क्षितीज उभं केलं. हे या कवितासंग्रहातून जाणवतं. एकूणच निसर्गप्रतिमांचे विलक्षण वेड असणारा आणि त्या प्रतिमांतून बोलणारा हा कवी निसर्गायन करतांना दिसतो. त्यांच्या 'समयी आणि मोक्ष', 'सुईमागे यावे दोऱ्याने', 'आनंदाचे पीठ', 'श्रीफळ' अशा काही रूपकात्मक रचना मनाला भावतात. लयबद्ध रचना हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कवितेतील प्रतिमा या अनेकार्थक्षम आहेत. त्या प्रतिमा कवितेतील आशयाला समृद्ध करतात कवितेला गती प्राप्त करून देतात. काही प्रतिमा सहज आकळतात तर काही ग्रेसांच्या कवितेतील प्रतिमांसारख्या दुर्बोधही वाटतात. जटायू, कावळा, समुद्र पक्षी अशा अनेक प्रतिमा वेगळ्या प्रकारच्या जाणिवा व्यक्त करतात. लोकसाहित्याच्या छटासुद्धा त्यांच्या कवितेतून जाणवतात याबरोबरच पारंपारिक मिथकाला नवा अर्थ प्रदान करणे हे या कवितेचं आणि कवीचं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. 'जीवन म्हणजे बाराखडी' यातून आलेली कावळ्याची प्रतिमा असू द्या किंवा 'स्वप्न दे मला' यातून वामन आणि बळीराजा याबद्दलची आलेली प्रतिमा याचबरोबर 'तुम्ही मला काय म्हणाल' या कवितेतून गुरुद्रोणाचार्याने अंगठा मागितला तर थम्सअप सारखा दाखवून सॉरी म्हटलं अशा येणाऱ्या प्रतिमा इतकच नव्हे तर 'आजी' या कवितेतून परीला छेडणाऱ्या राक्षसाची येणारी कथा किंवा 'लाटेरी दुखणे' या कवितेतील अगस्तिची आत्महत्या या पारंपारिक संकेताला नव्या जाणिवेसकट प्रकट करणारी ही वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. यातील प्रत्येक कविता ही आपल्या स्वतंत्र अर्थासकट प्रकटलेली आहे. अनेक कवितेतून शेवटी प्रश्नार्थक ओळ देवून रसिकांना आत्मसन्मुख करीत विचारप्रवृत्त केले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. जयस्वाल राजन (२०२२) क्षितिज, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.
2. नाईकवाडे राजेंद्र (२०१८) संस्कृती आणि साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर.
3. काळे अक्षयकुमार (१९९९) पा.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर.
4. ठाकरे कोमल (२०१२) साहित्यदिंडीचा वारकरी मधुकर केचे, विजय प्रकाशन, नागपूर.
5. कुलकर्णी वा. ल. (१९०१) मराठी कविता जुनी आणि नवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
6. रसाळ सुधीर (१९८२) कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, मुंबई.